लोकसत्ता ५.५.१.

# रस्त्याच्या उंचीची वाहनचालकांना अडचण

## उड्डाणपुलाखाली वाहने वळविताना अपघाताची शक्यता

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई:** मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू आहे. या कामामुळे रस्त्याची उंची वाढली आहे. मात्र या उंचीमुळे उड्डाणपुलाखाली वळसा घेणाऱ्या वाहनचालकांना अडचणी निर्माण होऊ लागल्या आहेत. चालकांना वाहन उतरविण्यासाठी उतारमार्ग तयार करण्यात यावे, अशी मागणी करण्यात येत आहे.

मुंबई-अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर पावसाळ्यात पडणारे खड्डे व इतर समस्या यासाठी प्राधिकरणाने या रस्त्याचे काँक्रीटीकरण करण्याचे काम सुरू केले आहे. सुमारे सहा इंच इतकी काँक्रिटीकरणाचा थर अंथरला जात आहे. त्यामुळे रस्त्याची उंची वाढली आहे. वसई पूर्वेतील महामार्गावरील सुरू असलेले काँक्रीटिकरणाचे मुंबई वाहिनीचे काम जवळपास अंतिम टप्प्यात आले असून गुजरात वाहिनीवर काँक्रीटीकरण अंथरण्याचे काम सुरू आहे. या वाढलेल्या उंचीमुळे महामार्ग सोडून इच्छितस्थळी जाणाऱ्या वाहनचालकांना आपली वाहने खाली उतरविताना अडचणी निर्माण होत आहेत. विशेषतः महामार्गावर जे उड्डाणपूल आहेत त्याच्या खालून जाण्यासाठी महामार्गाच्या बाजूने रस्ता आहे. त्या रस्त्यावर उंचीमुळे वाहन उतरविता येत नसल्याचे वाहन चालकांनी सांगितले आहे. जरी उतरविण्याचा प्रयत्न केला तरी कमी उंचीच्या वाहनांना खालच्या बाजूस धडक लागते.

यामुळे वाहनांचे नुकसान होऊन आर्थिक फटका सहन करावा लागत आहे. उड्डाणपुलांखाली वळसा घेताना उंचीमुळे लहान हलक्या वाहनांसह चारचाकी वाहनांच्या चालकांना सखल भागामुळे उतरता येत नसल्याने त्यांचा प्रवास अडचणींचा ठरत आहे असे वाहनचालक प्रकाश पाटील यांनी सांगितले आहे. महामार्ग प्राधिकरणाने याकडे लक्ष देऊन वाहनांच्या उतारासाठी बाजूने माती भराव किंवा डांबरीकरण करून उतारमार्ग तयार करावा, अशी मागणी करण्यात येत आहे.

---

# बांधकामाची भिंत कोसळून एकाचा मृत्यू, एक जण जखमी

## नायगाव पोलीस ठाण्यात ठेकेदाराविरोधात गुन्हा

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** वसई पूर्वेच्या पोमण येथे अनधिकृत गोदामाचे बांधकाम सुरू असताना भिंत कोसळून झालेल्या दुर्घटनेत एक तरूण कामगाराचा मृत्यू झाला तर त्याचा भाऊ गंभीर जखमी झाला आहे. या प्रकरणी नायगाव पोलिसांनी ठेकेदाराविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

नायगाव पूर्वेच्या साटीकर पाडा येथे एका अनधिकृत गोदामाचे बांधकाम सुरू होते. यावेळी येथे अकरा मजूर काम करत होते. काम करत असताना अचानक गोदामाची भिंत कोसळली. या दुर्घटनेत दोन कामगार भिंतीच्या ढिगाऱ्याखाली कोसळले. त्यामध्ये आकाश टिकोरीलाल गौतम (२१) या कामगाराचा मृत्यू झाला तर त्याचा चुलत भाऊ भसियानंद गौतम हा जखमी झाला. त्याच्यावर सातिवली येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

ठेकेदार प्रभू कडव याने कामगारांना कुठल्याही सुरक्षेची साधने पुरवली नव्हती. त्यामुळे त्याच्यावर नायगाव पोलीस ठाण्यात कलम ३०४ अ, ३३७, ३३८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

हे बांधकाम अनधिकृत असून त्याची शहानिशा करण्यासाठी आम्ही ग्रामपंचायत, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि तहसीलदारांकडे तक्रार केली आहे, अशी माहिती या प्रकरणाचे तपास अधिकारी महेश बोडके यांनी दिली.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

पुण्यनगरी पा.नं.३.

# आरक्षणाची अंमलबजावणी न करणाऱ्यांना वठणीवर आणा – मनोज जरांगे–पाटील

**जळकोट :** राज्याच्या गृहमंत्र्याला तडिपार करा, सरकारच्या मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार. एकजूट ठेवा, फूट पडू देऊ नका. सगे-सोयरेच्या अधिसूचनेची अंमलबजावणी न करता समाजाशी दगाबाजी करणाऱ्यांना वठणीवर आणा. एकीत फूट पडू देऊ नका, असे आवाहन मराठा आरक्षण संघर्ष योद्धा मनोज जरांगे-पाटील यांनी मंगळवारी समाज बांधवांना केले.

जळकोट येथील द्वारकामाता मंगल कार्यालयात मंगळवारी मराठा समाज बांधवांच्या संवाद बैठकीत ते बोलत होते. यावेळी जळकोट नगरपंचायतीच्या वतीने नगराध्यक्षा प्रभावती कांबळे, उपनगराध्यक्ष मन्मथ किडे, नगरसेवक, मुस्लिम, लिंगायत बांधव, आदिवासी समाज



बांधव यांच्यातर्फे मनोज जरांगे यांचा सत्कार करण्यात आला.

विजांच्या कडकडाटात आणि पावसात जरांगे-पाटील सरकारला इशारा देताना म्हणाले, जातीला बाप न मानणारे पक्षाला जर बाप मानत असतील तर त्यांना बाजूला सारा. बीड जिल्ह्यातील नारायण गड येथे होणाऱ्या ९०० एकरवरील सभेसाठी मराठ्यांसह अन्य समाजाच्या कार्यकर्त्यांनी उपस्थित राहावे. राज्याच्या गृहमंत्र्याला तडिपार करा, केसेसला भिऊ नका, मी जेलमध्ये जायची तयारी ठेवली आहे. जेलमध्ये बसून देखील आंदोलन सुरू ठेवेन. आदर्श आचारसंहितेचे पालन करीत आचारसंहितेत सुरू असणारे हे देशातील पहिले आंदोलन आहे. माझ्या घरावर सरकारकडून दररोज एक नोटीस लावली जात आहे. घराला जणू काही स्टाईल बसवले आहेत की काय, अशी अवस्था झाली असल्याची मिश्कील टीका त्यांनी यावेळी केली. यावेळी लहान मुलाच्या हस्ते मनोज जरांगे-पाटील यांचा सत्कार करण्यात आला. बैठकीस तालुक्यातील मराठा बांधवांसह मुस्लिम, लिंगायत व आदिवासी समाज बांधव उपस्थित होते.

पुण्यनगरी पृ-५१

# ४ कामगारांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू

**नालासोपारा :** विरारमध्ये एसटीपी प्लांट साफ करण्यासाठी उतरलेल्या चार कामगारांचा गुदमरून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली आहे. विरार पश्चिमेच्या ग्लोबल सिटी परिसरात ही घटना घडली. मंगळवारी सकाळी एसटीपी प्लांट साफ करण्यासाठी कामगार उतरले होते. मात्र कामगारांचा टाकीतच गुदमरून मृत्यू झाला. या घटनेची माहिती अर्नाळा पोलीस व वसई विरार महापालिकेच्या अग्निशमन पथकाच्या जवानांना मिळाल्यानंतर त्यांनी मृतदेह बाहेर काढण्याचे प्रयत्न सुरू केले. जवानांनी ऑक्सिजन सिलिंडरचा वापर करून पाण्याच्या टाकीतून ४ जणांचे मृतदेह बाहेर काढले. शुभम पारकर (२८), निखिल घाटाळ (२४), सागर तेंडुलकर (२९) व अमोल घाटाळ अशी मृतांची नावे आहेत. पॉलीकॅप कंपनीमार्फत एसटीपी प्लांटच्या साफसफाईचे काम केले जात असल्याची माहिती पोलीस तपासात समोर आली.

पुढारी पा.नं.५.

# भाईंदर शहरात खोदकामाने नागरिक प्रचंड त्रस्त

**भाईंदर : राजू काळे**

मिरा-भाईंदर शहरात आगामी विधानसभा निवडणुकीपूर्वी शहरातील सुमारे ७० किमी हुन अधिक रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचा धडाका काही लोकप्रतिनिधींच्या अट्टाहासामुळे सुरु झाला आहे. यामुळे पालिकेने शहरातील बहुतांशी रस्ते खोदले असतानाच त्यात पाणीपुरवठा योजनेंतर्गत जलवाहिन्या व गॅस पुरवठा करण्यासाठी गॅस वाहिन्या अंथरण्यासाठी देखील ठिकठिकाणच्या रस्त्यांचे खोदकाम करण्यात आले आहे.

यामुळे शहरात वाहतूक कोंडीची समस्या मोठ्याप्रमाणात उदभवल्याने शहरात वाहतूक कोंडीसह वातावरणात धुळीचा धुराळा उडण्याचे प्रमाण वाढल्याचे दिसून येत आहे.

रस्त्यांच्या खोदकामांमुळे उद्भवलेल्या वाहतूक कोंडीत अत्यावश्यक सेवेतील वाहने सुद्धा अडकून पडत असल्याचे निदर्शनास आले आहे. मात्र हि पावसाळ्यापूर्वी केली जाणारी कामे असल्याचा दावा प्रशासनाकडून करण्यात आला असून पावसाळ्यात रस्त्यांवरील खोदकाम टाळण्यासाठीच त्यापूर्वी कामे पूर्ण करण्याची कार्यवाही करण्यात येत असल्याचे सांगण्यात येत आहे.

यातील काही रस्ते वाहतुकीसाठी बंद करण्यात आले असून काही रस्त्यांवरील एकाच मार्गावर वाहतुकीची ये-जा सुरु आहे. परिणामी या रस्त्यांवर वाहतूक कोंडीची समस्या उद्भवली असून त्याच्या नियोजनासाठी कोणतीही उपाययोजना करण्यात आली नसल्याचे निदर्शनास येत आहे.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

पुण्यनगरी पु. ५-६.

# निवडणूक कामाला जुंपल्याने कार्यालये पडली ओस

## नागरिकांना कामासाठी मारावे लागतात हेलपाटे

**मीरा रोड :** गेल्या काही दिवसांपासून लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता लागू झाली आहे. या निवडणुकीच्या कामासाठी प्रत्येक शासकीय कार्यालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे जनतेला आवश्यक असलेले मीरा-भाईंदर अपर तहसीलदार कार्यालयदेखील ओस पडल्याचे चित्र दिसून येत आहे. कार्यालयात कोणताच अधिकारी व कर्मचारी उपस्थित नसल्याने कामासाठी आलेल्या नागरिकांना आपली कामे होत नसल्याने माघारी परतावे लागत आहे. अनेक ज्येष्ठ नागरिक व विद्यार्थ्यांच्या दाखल्याची कामे होत नसल्याने त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे.

निवडणुकीचे काम सुरू झाल्यामुळे गेल्या काही दिवसांपासून शासकीय कार्यालये आणि प्रामुख्याने मीरा-भाईंदर महापालिका स्थानिक स्वराज्य संस्थांची कार्यालये ओस पडली आहेत. मीरा-भाईंदरमधील अपर तहसीलदार कार्यालयावर आचारसंहितेचा मोठा परिणाम



झाल्याचे दिसून येत आहे. या कार्यालयात अधिकारी, कर्मचारी निवडणूक कामाला जात असल्याचे सांगत कार्यालयात उपस्थित राहत नसल्याचे दिसून येते. सोमवारी तर तहसील कार्यालय ओस पडले होते. त्यामुळे महसूल विभागाला सुट्टी आहे की काय, असा प्रश्न निर्माण झाला होता.

आचारसंहितेमुळे कोणतीही नवीन कामे मंजूर होत नाहीत. परंतु नागरिकांना अत्यावश्यक असलेले उत्पन्नाचा दाखला, रहिवाशी, जातीचे दाखले व ज्येष्ठ नागरिक दाखला आणि क्रिमिलेअर प्रमाणपत्रे यांचीही कामे होताना दिसत नाहीत. यामुळे नागरिकांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे. मुंबई उच्च न्यायालयाचे आदेश असताना आचारसंहितेच्या नावाखाली अतिसंवेदनशील सीआरझेड, पाणथळ, बफर झोन व मँग्रोज भागात कांदळवनात माती भराव व कत्तल सुरू असल्याच्या तक्रारी, तसेच शहरातील नवीन इमारतीचे सुरू असलेल्या काम व सिमेंट रस्ते व मेट्रो लाइन यांच्यातून निघणारा राडारोडा व डेब्रिज टाकून पर्यावरणाचा ऱ्हास सुरू आहे. त्याकडे महसूल विभागाचे अधिकारी, कर्मचारी नसल्याने दुर्लक्ष होत आहे. यावर तातडीने जिल्हाधिकाऱ्यांनी लक्ष घालण्याची गरज आहे. सामान्य जनतेच्या कामांना प्राध्यान देऊन त्यासोबत निवडणुकीचे काम करावे.

> " अपर तहसीलदार यांच्याशी बोलून जनतेच्या अत्यावश्यक असलेल्या कामाकडे लक्ष देण्यास सांगितले जाईल. तसेच नागरिकांच्या अत्यावश्यक असलेल्या कामाबाबत जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून त्यावर तोडगा काढण्यात येऊन निवडणुकीच्या कामाबरोबर नागरिकांच्या कामालादेखील प्राधान्य दिले जाणार आहे.
>
> **– सुदाम परदेशी, निवासी उपजिल्हाधिकारी, ठाणे**

> " लोकसभा निवडणुकीची आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे मंडळ अधिकारी व तलाठी यांनाही निवडणुकीची कामे देण्यात आली आहेत. तसेच अधिकारी, कर्मचारी हे त्यांच्या सोयीनुसार नागरिकांची कामे तत्परतेने करत आहेत. विद्यार्थी व ज्येष्ठ नागरिकांच्या कामाला प्राधान्य देऊन काही प्रमाणात कामे सुरू आहेत. निवडणुकीच्या कामासाठी वर्ग केलेल्या कर्मचाऱ्यांव्यतिरिक्त कोणी गैरहजर राहत असेल तर त्यांचा बेशिस्तपणा खपवून घेतला जाणार नाही.
>
> **– निलेश गौंड, अपर तहसीलदार, मीरा-भाईंदर**

पुढारी ५-९-५.

# ऑनलाईन गुंतवणुकीत फसवणूक झालेली रक्कम पोलिसांनी दिली मिळवून

**मिरा रोड : पुढारी वृत्तसेवा**

वालीव पोलीस ठाणे हद्दीत राहणाऱ्या इसमाला इन्व्हेस्टमेंट अँपमध्ये ऑनलाईन गुंतवणुक करण्यास सांगुन ११,१४,२५० रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. सायबर पोलीसांनी तपास करून तक्रारदार यांना फसवणूक झालेली पूर्ण रक्कम परत मिळवून दिली आहे.

मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालयातील वालीव पोलीस ठाणेचे हद्दीतील तक्रारदार गुप्ता यांनी एका इन्व्हेस्टमेंट अँपमध्ये गुंतवणुक करुन दुप्पट रक्कम मिळत असल्याबाबत जाहिरात पाहून अँपमध्ये पैसे गुंतवणुक केली. जाहिरातीमध्ये नमुद केल्याप्रमाणे तक्रारदार यांनी एकुण ११,१४,२५० रुपये भरले. तक्रारदार यांनी गुंतवणुक केलेल्या रक्कमेचा कोणताही परतावा परत मिळाला नाही. त्यामुळे त्यांची फसवणुक झाल्याबाबत सायबर पोलीस ठाण्यात तक्रार करण्यात आली होती. संपूर्ण तपासानंतर तक्रारदार यांची रक्कम त्यांच्या मुळ खात्यात जमा होण्यासाठी न्यायालयात वेळोवेळी पाठपुरावा करुन तक्रारदार यांची फसवणुक झालेली ११,१४,२५० रुपये न्यायालयाच्या आदेशाने तक्रारदार खात्यात परत सायबर पोलिसांनी मिळवून दिले आहेत.

Scanned with OKEN Scanner
CamScanner

सकाळ पु. पा. ३.

विवा महाविद्यालयात रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत प्रशिक्षण केंद्र

# शिक्षणाबरोबर वाहतूक नियमांचे धडे

विरार, ता. ९ (बातमीदार) : रस्ता सुरक्षा ही आता काळाची गरज बनली आहे. तरुणाई जोशात येऊन रस्त्यावरील नियम न पाळता गाड्या जोरात चालवत असतात. त्यांना योग्य असे प्रशिक्षण मिळावे, यासाठी प्रशिक्षण केंद्रातून उपक्रम राबविला जाणार आहे. तसेच महिला सबलीकरणाचा नुसता नारा न देता त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी, तसेच त्यांना योग्य प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे राहता यावे, यासाठी 'कोकणकन्या' उपक्रम सुरू करण्यात आला आहे, असे प्रतिपादन आमदार हितेंद्र ठाकूर यांनी केले.



विरार : आमदार हितेंद्र ठाकूर यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण केंद्र सुरू करण्यात आले.

गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर आज (ता. ९) महाराष्ट्र राज्याच्या उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहायता केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने सुरू असणाऱ्या करिअर कट्टा या उपक्रमांतर्गत राज्यातील पहिले रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत सुसज्ज प्रशिक्षण केंद्र विवा महाविद्यालयात सुरू करण्यात आले. या कार्यक्रमात आमदार हितेंद्र ठाकूर बोलत होते. या वेळी आमदार क्षितिज ठाकूर, भगवान राजपूत, जितूभाई शहा, शिखर ठाकूर, संजय पाटील, संजय पिंगुळकर, माजी नगराध्यक्ष मुकेश सावे, अजीव पाटील आदी मान्यवर उपस्थित होते.

कमी उत्पन्न गटातील मुलींना स्वयंरोजगाराची संधी उपलब्ध करून देणारी 'कोकणकन्या' या फूड व्हॅनचा मुहूर्त साधण्यात आला. रस्ता अपघातांमध्ये जखमी किंवा मृत्युमुखी पडणाऱ्यांची वय ४० वर्षांच्या आतील आहे. यावर उपाय म्हणून महाविद्यालयीन शिक्षण घेत असतानाच विद्यार्थ्यांना वाहन चालवत असताना आवश्यक असणाऱ्या कायदेशीर बाबींचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

सकाळ पु-पा-९.

# जास्त परताव्याच्या प्रलोभनाने लाखांची लूट

भाईंदर, ता. ९ (बातमीदार) : अर्धवेळ काम करून गुंतवलेल्या रकमेपेक्षा जास्त परतावा मिळवण्याचे प्रलोभन दाखवून उत्तन येथील तरुणाची अडीच लाखांची फसवणूक करण्यात आली. मात्र, पोलिसांनी दाखवलेल्या सतर्कतेमुळे पैसे परत मिळवण्यात यश आले आहे.

उत्तन सागरी पोलिस ठाण्याच्या परिसरात राहणारा २३ वर्षीय तरुण अर्धवेळ नोकरीसाठी इंटरनेटवर शोध घेत होता. त्यावेळी एका अनोळखी मोबाईल क्रमांकावरून मौरीन नावाच्या व्यक्तीने व्हॉट्सॲपद्वारे त्याच्या मोबाईलवर एक लिंक पाठवली. या लिंकद्वारे ऑनलाईन वस्तू खरेदी करून त्या पुन्हा विक्री करण्याचे टास्क पूर्ण केले तर जास्त परतावा मिळेल, असे प्रलोभन दाखविण्यात आले. त्यासाठी त्या तरुणाला वेगवेगळ्या बँक खात्यात ऑनलाईन पैसे भरण्यास भाग पाडण्यात आले. तरुणाने दोन लाख ४९ हजार रुपये पाठवून ऑनलाईन टास्क पूर्ण केले; परंतु त्यानंतरही भरलेले पैसे तर मिळालेले नाहीच, शिवाय जास्त परताव्याची रक्कमही देण्यात आली नाही. त्यामुळे तरुणाने उत्तन सागरी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली.

पोलिसांनी पीडित तरुणाने ज्या वेगवेगळ्या बँक खात्यात पैसे ऑनलाईन हस्तांतर केले होते, त्या खात्यातील रक्कम गोठवली. त्यानंतर ही रक्कम परत मिळविण्यासाठी न्यायालयाकडे पाठपुरावा केला. त्यामुळे फसवणूक झालेली दोन लाख ४९ हजार रुपयांची रक्कम तरुणाच्या खात्यात जमा करण्यात उत्तन सागरी पोलिसांना यश आले.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

लोकमत पु.पा.३.

## काम करूनही पैसे न दिल्याने दिली धमकी

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** भाच्याच्या कामाचे पैसे न दिल्याने संतप्त झालेल्या मामाने पैसे न दिल्यास बघून घेण्याची धमकी दिल्याप्रकरणी अदखलपात्र गुन्हा दाखल झाला आहे. काशीमीरा भागातील मुंशी कम्पाऊंडमध्ये लक्ष्मण शेषराम चौधरी (वय ३४) यांचा बांगडी कारखाना आहे. त्यांच्या कारखान्यात नवाब शेख काम करत होता. कारखान्यात नुकसान झाल्याचे कारण सांगून चौधरी यांनी नवाब याचे ४० हजार रुपये दिले नव्हते. त्यामुळे नवाबचे मामा सलीम शेख (रा. रावळपाडा, दहिसर) यांनी नवाबचे पैसे न दिल्यास बघून घेईन, अशी धमकी दिल्याची तक्रार चौधरी यांनी काशीमीरा पोलिसांकडे केली. त्यानुसार पोलिसांनी सलीम यांच्यावर अदखलपात्र गुन्हा दाखल केला आहे.

## ८० वीज चोरांना महावितरणचा दणका, चार वेगवेगळे गुन्हे दाखल

### आकडा टाकून रात्री होते चोरी : भरारी पथके कार्यरत

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसई तालुक्यात वीज चोरी करणाऱ्या टोळ्या सक्रिय असून या टोळ्या रात्रीच्या सुमारास वीज खांबावर आकडा टाकून वीज चोरी करतात.

या वीज चोरांविरोधात महावितरण आक्रमक झालेली आहे. महावितरणच्या अधिकाऱ्यांनी नवजीवन, शांती नगर, गांगडेपाडा, धानिवबाग, जाधवपाडा, गावदेवी, वाकणपाडा, पेल्हार या परिसरात धाड टाकून मागील ९ ते ११ महिन्यांपासून होत असलेल्या वीज चोरीचा पर्दाफाश केला आहे. ८० वीज चोरांना महावितरणने दणका देत त्यांच्यावर रविवारी नालासोपारा पोलिस ठाण्यात चार वेगवेगळे गुन्हे दाखल केले आहेत.



■ या वीज चोरांवर नियंत्रण आणण्यासाठी आणि कारवाई करण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी भरारी पथक तयार करून त्या पथकाद्वारे कारवाई केली जात आहे. नागरिकांनी वीज चोरी दंडाचे देयक भरले नाही. ते न भरल्यामुळे त्यांनी कंपनीची ९ लाख २३ हजार ४८० रुपयाची वीज चोरून नुकसान केले आहे. महावितरणचे सचिन येतगुडे (३८) यांनी या वीज चोरांविरोधात तक्रार दिली असून, ८० जणांवर नालासोपारा पोलिस ठाण्यात चार गुन्हे दाखल केले आहेत.

### कुठे होते वीज चोरी?

तालुक्यात सर्वात जास्त वीज चोरी नालासोपारा पूर्वेकडील संतोष भवन, गावराई पाडा, वालईपाडा, मोरेगाव, नागिनदास पाडा, आचोळे डोंगरी विरार पूर्वेकडे कातकरी पाडा, चंदनसार, मनवेलपाडा, कारगिल नगर वसई पूर्वेकडे भोयदापाडा, नवजीवन, सातीवली, वालीव तर नायगांव पूर्वेकडील जुचंद, टाकी पाडा या विभागात होते. या विभागात अनधिकृत बांधकामे जोमाने सुरू असल्यामुळे आणि वीज चोरी करणाऱ्या टोळ्या ह्याच विभागात कार्यरत असून या इमारतींना चोरीची वीज वापरण्यास देतात. संध्याकाळ झाली की विजेच्या खांबावर आकडे टाकून वीज चोरी होते.

लोकमत पु.पा.३.

## लग्न मोडण्याची धमकी देऊन केले अत्याचार

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** मीरा रोड भागात राहणाऱ्या एका महिलेचा मोबाइल हॅक करून तिचे तीन-चार लोकांसोबत शारीरिक संबंध करतानाचे फेक व्हिडीओ बनवून ते व्हायरल करण्याची धमकी महिलेला दिली. तसेच त्या फेक व्हिडीओच्या आधारे मुलाच्या लग्नात अडथळा आणून ठरलेले लग्न मोडेन, असे धमकावून त्या महिलेवर इच्छेविरुद्ध बलात्कार करण्यात आल्याची घटना मीरा रोड भागात घडली आहे.

याप्रकरणी महिलेच्या फिर्यादीनंतर काशीमीरा पोलिसांनी शहजाद अली ताज मोहम्मद अली शहा (वय २२, रा. मीरा रोड) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करत ७ एप्रिल रोजी त्याला अटक केली आहे.

शहजाद हा मूळचा राहणार उत्तर प्रदेशचा राहणारा असून पीडित महिलेच्या वयापेक्षा निम्म्याने कमी वयाचा आहे. या घटनेने खळबळ उडाली असून काशीमीरा पोलिस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक राजेंद्र कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अधिक तपास करत आहेत.

लोकमत पु.पा.४.

## गुजरातहून आणलेला २० गोणी मावा जप्त

### प्रवासी लक्झरी बसमधून सुरू होती वाहतूक

लोकमत न्यूज नेटवर्क

**मीरा रोड :** गुजरातवरून नियमित येणाऱ्या प्रवासी लक्झरी बसमधून आणला जाणारा २० गोणी मावा काशीगाव पोलिसांनी जप्त केला आहे. त्यातील काही मावा तपासणीसाठी अन्न व औषध प्रशासनाने घेतला असून उर्वरित मावा नष्ट करण्यात आला आहे. बसमधून मोठ्या प्रमाणात मावा ऐन सणासुदीच्या दिवसात बाहेरून आणला जात असल्याचे या प्रकाराने उघड झाले आहे.

गुजरातकडून येणाऱ्या दोन लक्झरी बसमधून भेसळयुक्त मावा आणला जात असल्याची माहिती काशीगाव पोलिस ठाण्याच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेतील सहायक पोलिस निरीक्षक माणिक पाटील यांना मिळाली.

■ वपोनि राहुलकुमार पाटील यांच्या मार्गदर्शनखाली पोलिस पथकाने मंगळवारी महामार्गावरील काशिमीरा उड्डाणपूल परिसरात लक्ष्मीबाग येथे दोन बसमधून २० गोणी मावा जप्त केला. हा मावा गुजरातवरून बसमधून आणल्याचे चौकशीत समोर आले आहे.

■ याची माहिती अन्न व औषध प्रशासनाला दिल्यानंतर अन्न प्रशासनाच्या सहायक आयुक्त धनश्री ढाणे यांच्या मार्गदर्शनाखाली अन्न सुरक्षा अधिकारी भरत वसावे यांनी माव्याचे नमुने तपासासाठी घेतले असून उर्वरित मावा नष्ट केला. माव्याच्या तपासणीचा अहवाल आल्यानंतर कायदेशीर कारवाई केली जाणार आहे.

Scanned with OKEN Scanner

CamScanner

लोकमत पु.प.१.   पु.प.१   पु.प.४.



मीरा-भाईंदर परिसरात गुढीपाडव्यानिमित्त काढलेल्या शोभायात्रेत ग्रामस्थांसह महिलांनी पारंपरिक वेशात प्रभातफेरी काढली. (छाया : धीरज परब)

# मीरा-भाईंदरमध्ये प्रभातफेरी, शोभायात्रा

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मीरा-भाईंदरमध्ये मंगळवारी गुढीपाडवा मोठ्या जल्लोषात साजरा करण्यात आला. घोडबंदर गाव, राईगाव, मुर्धा, मोरवा आदी गावांमध्ये गुढीपाडव्याची ग्रामस्थांनी पारंपरिक वेशात प्रभातफेरी काढली होती.

हिंदू नववर्ष स्वागत यात्रा समिती मीरा रोडच्या वतीने शाश्वत कॉम्प्लेक्स, प्लेझंट पार्कपासून डॉन बॉस्को शाळा व परत अशी स्वागत यात्रा काढली होती. पेणकरपाडा येथे सिद्धिविनायक नगर, चामुंडा बिल्डिंग, जया पार्क ते साईदत्त तलाव अशी स्वागत यात्रा निघाली. भाईंदर पश्चिमेला सायंकाळी शोभायात्रा काढण्यात आली होती. शहरात राजकीय पक्षांनीदेखील विविध मिरवणूक, शोभायात्रांचे आयोजन केले होते. ठिकठिकाणी आकर्षक रांगोळ्या काढण्यात आल्या होत्या. फुलांनी परिसर सजवण्यात आला होता. महिला, पुरुष, मुले आदी पारंपरिक वेशभूषेत मिरवणुकांमध्ये सहभागी झाले होते. लेझीम, ढोलताशांच्या गजरात मिरवणुकांमध्ये मोठ्या संख्येने लोक सहभागी झाले होते.

## चैत्र नवरात्रोत्सव

भाईंदर पूर्वेच्या नर्मदानगरमध्ये जिद्दी मराठा संस्थेच्या वतीने चैत्र नवरात्रोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. आज देवीच्या मूर्तीची स्थापना करण्यात आली. १८ एप्रिल रोजी देवीच्या मूर्तीचे विसर्जन होणार आहे. मीरा रोडच्या बेव्हर्ली पार्क येथील नामदार गोखले मैदान येथे चैत्र नवरात्रीचे आयोजन केले गेले आहे. मीरा रोडच्या हटकेश भागातून देवीच्या मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली.

## पोलिस आयुक्तालयात २८ मिरवणुका

मीरा भाईंदर-वसई विरार पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत गुढीपाडव्यानिमित्त १६ शोभायात्रा, पाच मिरवणुका, तीन स्वागत यात्रा, दोन पालखी मिरवणूक, दोन दुचाकी रॅली अशा एकूण २८ मिरवणुकांचे आयोजन करण्यात आले होते. नवघर, मीरा रोड, माणिकपूर पोलिस ठाणे हद्दीत तीन सांस्कृतिक कार्यक्रम तर विरार पोलिस ठाणे हद्दीत एक सत्यनारायण पूजा आयोजित केल्याची आकडेवारी पोलिसांकडून देण्यात आली होती.

# बेकरीतून मोबाइल चोरीला

नालासोपारा : विरारच्या गणपती मंदिराजवळील इंदौरी बेकरी नावाच्या दुकानात शनिवारी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास दोन आरोपींनी येऊन १२ हजारांचा मोबाइल चोरून नेला आहे. दीपक जयस्वाल (३५) यांनी विरार पोलिस ठाण्यात तक्रार देऊन गुन्हा दाखल केला आहे.

# लग्नाचे आमिष देऊन अत्याचार



नालासोपारा : नालासोपाऱ्यात राहणाऱ्या ३२ वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून जुलै २०२० ते डिसेंबर २०२३ दरम्यान तिच्यावर अत्याचार केल्याची घटना उघडकीस आली आहे. आरोपीने ३० मार्च ही लग्नाची तारीख ठरलेली असतानाही तिच्याशी लग्नास नकार दिला. फसवणूक झाल्याचे लक्षात येताच शनिवारी तुळींज पोलिस ठाण्यात तक्रार देऊन अत्याचाराचा गुन्हा दाखल केला आहे.

# तुळिंजमधून दुचाकीची चोरी

नालासोपारा : टाकी रोडवरील राधेश्याम सोसायटीत राहणाऱ्या अरविंद खुमान (३३) यांची ३५ हजार रुपये किमतीची दुचाकी चोरीला गेली आहे. ६ एप्रिलला रात्री इमारतीच्या पार्किंगमध्ये पार्क केलेली दुचाकी चोरट्याने चोरून नेली आहे. तुळिंज पोलिसांनी शुक्रवारी गुन्हा दाखल केला आहे.

# अल्पवयीन भाचीवर काकाने केला अत्याचार

लोकमत न्यूज नेटवर्क

मीरा रोड : मावशीकडे राहणाऱ्या अल्पवयीन मुलीवर काकाने (मावशीच्या नवऱ्याने) अत्याचार केल्याचा गुन्हा काशीगाव पोलिस ठाण्यात दाखल झाला आहे.

पीडित मुलगी अल्पवयीन असताना काशीमीरा येथे मावशी व काका यांच्या घरी जुलै २०२१ ते मार्च २०२४ या काळात राहत होती. मावशी ही गावी गेली असताना काकाने तिच्या अनाथ व एकटेपणाचा गैरफायदा घेत तिच्यावर बळजबरीने अत्याचार केले. काकाच्या लैंगिक अत्याचाराला कंटाळून अखेर ती कांदिवली भागात राहायला गेली. पीडिता सध्या १९ वर्षांची आहे. तिने तिच्यावरील अत्याचाराबद्दल चारकोप पोलिस ठाण्यात फिर्याद दिल्यानंतर पोलिसांनी गुन्हा दाखल करून तो काशीगाव पोलिसांकडे हस्तांतरित केला आहे.

Scanned with OKEN Scanner
CamScanner

लोकसत्ता ५.५.२४.

# अमली पदार्थनिर्मितीचे विष ग्रामीण भागातही

**शहरी भागात तपास यंत्रणांची नजर असल्याने, तस्करांनी आपला मोर्चा ग्रामीण भागाकडे वळवला आहे . ग्रामीण भागातील बंद पडलेल्या कारखान्यात अथवा पडीक शेतीत सर्रास अमली पदार्थाचे कारखाने सुरू झाले आहेत .**

अधोविश्व

अनिश पाटील

**भारतात अमली** पदार्थांची तस्करी तशी फार जुनीच. गोविंद नारायण मडगांवकर यांच्या १८६३ सालच्या 'मुंबईचे वर्णन' या पुस्तकात मुंबईत होणाऱ्या तस्करीचा उल्लेख आहे. पण आता रासायनिक अमली पदार्थांची भारतातच निर्मिती केली जात आहे. केटामाईन, एम्फेटामाईनसोबत आता मेफेड्रोनचीही निर्मिती मोठ्या प्रमाणात होऊ लागली आहे. शहरी भागात तपास यंत्रणांची नजर असल्याने, तस्करांनी आपला मोर्चा ग्रामीण भागाकडे वळवला आहे. ग्रामीण भागातील बंद पडलेल्या कारखान्यात अथवा पडीक शेतीत सर्रास अमली पदार्थांचे कारखाने सुरू झाले आहेत. या अमली पदार्थांच्या अजगरी विळख्याने हळूहळू ग्रामीण भाग आवळण्यास सुरुवात केली आहे.



गेल्या तीन वर्षांत नाशिक, सोलापूर, नालासोपारा, सांगली, कोल्हापूरमध्ये एमडी निर्मिती करणारा प्रत्येक एक कारखाना आणि गुजरातमधील दोन कारखाने असे एकूण सात मोठे कारखाने मुंबई पोलिसांनी उद्ध्वस्त केले. याशिवाय मुंबई पोलिसांनी दोन वर्षांत पाच हजार कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे एमडी जप्त केले. त्यापूर्वी २०१८ मध्ये मुंबई पोलिसांनी १० कोटी रुपयांचे एमडी जप्त केले होते. २०१९ मध्ये तीन कोटी, २०२० मध्ये पाच कोटी २१ लाख, २०२१ मध्ये ३२ कोटी २९ लाख रुपये किमतीचे एमडी जप्त केले होते. मग अचानक एवढ्या मोठ्या प्रमाणात एमडी कोठून येऊ लागले. श्रीमंतीची नशा आणि मस्तीची झिंग नसा-नसात भिनल्याने, अल्पवयीन मुलांपासून ते मध्यमवर्गीय व्यक्तीपर्यंत अनेकजण अमली पदार्थांच्या काळ्या जगात गटांगळ्या खात आहेत.

शहरापर्यंत मर्यादित असलेला अमली पदार्थांचा अजगरी विळखा राज्यातीलच नव्हे तर देशातील ग्रामीण भागालाही बसला आहे. शहरात अमली पदार्थांची तस्करी आणि त्याचा साठा हा तपास यंत्रणेच्या तात्काळ लक्षात येतो. त्यामुळे गेल्या काही वर्षांमध्ये तस्करांनी ग्रामीण भागात अमली पदार्थांचे कारखाने सुरू केले आहेत. राज्यातील सांगली, कोल्हापूर, सोलापूर आणि नाशिक भागांत तर दिवसाढवळ्या अमली पदार्थ बनविण्याचे कारखाने सुरू होते. तेही एवढे बेमालूमपणे की वर्षानुवर्षे याची कोणालाच माहिती नव्हती.

उदाहरणच द्यायचे झाले तर ललित पाटील प्रकरण ताजे आहे. राजकीय पक्षातील नेतेच नाही तर पकडल्यानंतर ससून रुग्णालयातील डॉक्टर आणि काही पोलिसांच्या मदतीने तो रुग्णालयातून अमली पदार्थांचा काळा बाजार चालवीत होता. राजकीय पाठबळ असल्यामुळेच त्याचे एवढे धाडस झाले. गेल्या काही दिवसांपूर्वी मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेने पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यात मेफेड्रोन निर्मितीचा कारखाना उद्ध्वस्त केला. कुर्ला, सांगली, गुजरातमधील सुरत येथे कारवाई करून पोलिसांनी २५२ कोटी रुपयांचे एमडी जप्त केले. या प्रकरणी १० आरोपींना अटक करण्यात आली. मुंबईतील लेडी माफीया अशी ओळख असलेल्या परवीन बानो शेख या महिलेला ६४१ ग्रॅम एमडीसह अटक करण्यात आली. १६ फेब्रुवारी रोजी करण्यात आलेल्या कारवाईत १२ लाख २० हजार व २५ ग्रॅम सोन्याचे दागिने पोलिसांनी हस्तगत केले. या वेळी चौकशीत तिने मिरारोड येथील व्यक्तीकडून एमडी घेतल्याचे सांगितले. त्यानुसार पोलिसांनी मिरारोड येथील एमडी विक्रेता साजीद शेख ऊर्फ डेबस याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे सहा कोटी किमतीचा तीन किलो एमडी व तीन लाख ६८ हजार रुपयांची रोकड असा मुद्देमाल सापडला. चौकशी केली असता तो सुरत येथील दोघांना एमडी विकत असल्याचे उघडकीस आले.

Scanned with OKEN Scanner
CS CamScanner

लोकसत्ता ५-५-१९.

# आदिवासी पाड्यांना टँकरने पाणीपुरवठा

## विहिरी कोरड्या पडल्याने महापालिकेचा निर्णय

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर :** एकीकडे मिरा-भाईंदर शहरातील नागरिकांना २४ तास पाणी उपलब्ध करून देण्याचा संकल्प महापालिकेने हाती घेतलेला असताना दुसरीकडे शहरातील जुने आदिवासी पाडे पाण्यासाठी व्याकुळ झाले आहेत. याबाबत तक्रारी वाढल्यानंतर अशा आदिवासी पाड्यांना अखेर टँकरने मोफत पाणी पुरवठा उपलब्ध करून देण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे.

मिरा-भाईंदर मधील काशिमीरा व घोडबंदर भागात संजय गांधी राष्ट्रीय उद्यानामध्ये अनेक आदिवासी पाडे आहेत.या पाड्यांत कित्येक वर्षांपासून आदिवासी नागरिक राहत आहेत. त्यामुळे अशा पाडयांना महापालिकेकडून कर आकारणी केली जाते.

मात्र प्रत्यक्षात येथील नागरिकांना कोणत्याच सोयी- सुविधा पुरवल्या जात नाही. परिणामी या आदिवासी पाड्यात नागरिकांना सतत संघर्ष करावा लागतो. महत्वाची बाब म्हणजे या आदिवासी पाड्यांत जलवाहिन्या अंथरूण पाणीपुरवठा उपलब्ध करून देण्यास देखील प्रशासनाला अपयश आले आहे.

> **मिरा-भाईंदरमधील ज्या आदिवासी पाड्यात पाण्याची समस्या जाणवत आहे. त्या ठिकाणी टँकरच्या मदतीने आवश्यकतेनुसार वेळोवेळी पाणी उपलब्ध करून दिले जाणार आहे.**
>
> -दीपक खांबित, शहर अभियंता, मिरा-भाईंदर महानगरपालिका.

त्यामुळे येथील नागरिकांना पाण्यासाठी विहिरीवर तसेच नैसर्गिक स्त्रोतावर अवलंबून राहावे लागते. आता उन्हाळा सुरु झाला असल्याने या पाड्यातील नद्या आटल्या आहेत. तर विहिरी कोरड्या पडू लागल्या आहेत.त्यामुळे कळशीभर पाण्यासाठी देखील येथील नागरिकांना मोठी कसरत करावी लागते. आगमी वर्षात महापालिकेला सूर्या धरण प्रकल्प योजनेतून २१८ दशलक्ष अतिरिक्त पाणीपुरवठा उपलब्ध होणार आहे. यामुळे शहरातील नागरिकांना २४ तास पाणीपुरवठा उपलब्ध करून दिला जाणार असल्याचा दावा होत आहे. परंतु इतके पाणी असताना देखील आदिवासी पाड्यांना कोरडे राहावे लागत असल्याने सामाजिक कार्यकर्ते संतप्त झाले आहे.

याबाबत त्यांनी महापालिकेकडे तक्रार केली असता.टँकरने अशा पाड्यांना मोफत पाणी उपलब्ध करून देण्याचा निर्णय आयुक्त संजय काटकर यांनी नुकत्याच पार पडलेल्या आढावा बैठकीत घेतला आहे.

लोकसत्ता ५-५-१९.

# आरक्षित जागेवर अतिक्रमण

## पालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरणाची कारवाई

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**वसई :** वसई-विरार महापालिकेने नायगाव पूर्वेच्या टीवरी फाटकाजवळ अग्निशमन उपकेंद्र उभारण्यासाठी आरक्षित केलेल्या जागेवर १९ हजार चौरस फुटांचे बांधकाम करून अतिक्रमण करण्यात आले होते. हे अतिक्रमण पालिकेच्या विशेष नियोजन प्राधिकरणाच्या पथकाने कारवाई करून जमीनदोस्त केले आहे.

वसई-विरार शहरात नागरीकरण वेगाने वाढत आहे. औद्योगिक वसाहती, बैठ्या चाळी उपाहारगृह यासह इतर आस्थपना यामुळे हा परिसरही अधिक दाटीवाटीचा बनला आहे. अनेकदा विविध ठिकाणी आगी लागण्याच्या घटना घडतात. अशा वेळी शहरी भागाच्या ठिकाणच्या अग्निशमन केंद्रातून सेवा पुरविली जाते. परंतु काही वेळा निर्माण होणाऱ्या वाहतूक कोंडीमुळे घटनास्थळी पोहचण्यासाठी वेळ लागतो. यासाठी विविध ठिकाणच्या भागात नवीन अग्निशमन उपकेंद्र उभारण्यासाठी पालिकेने जागा आरक्षित केल्या आहेत.

नायगाव पूर्वेच्या भागातील टीवरी परिसरात अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित असलेल्या जागेवर भूमाफियांनी अतिक्रमण करून गाळ्यांचे बांधकाम केले होते. याबाबत पालिकेकडे तक्रार प्राप्त होताच महापालिकेचे आयुक्त अनिलकुमार पवार, अतिरिक्त आयुक्त रमेश मनाळे याबाबत कारवाई करण्याचे आदेश विशेष नियोजन प्राधिकरणाला दिले होते. त्यानुसार नुकतेच टीवरी येथे अग्निशमन केंद्रासाठी आरक्षित जागेवर करण्यात आलेल्या अतिक्रमाणावर कारवाई करण्यात आली. ही कारवाई विशेष नियोजन प्राधिकरणाचे प्रभारी सहायक आयुक्त मोहन संख्ये, कनिष्ठ अभियंता हिमांशू राऊत व त्यांच्या पथकाने केली आहे.



### विरारच्या खैरपाडा येथेही कारवाई

**विरार पूर्वेच्या टोकरे खैरपाडा हा भाग विशेष नियोजन प्राधिकरणाच्या अंतर्गत येतो. या भागातही मोठ्या प्रमाणात अनधिकृत बांधकामे उभी राहिली आहेत. यावर सोमवारी विशेष नियोजन प्राधिकरणाचे प्रभारी सहायक आयुक्त मोहन संखे यांनी कारवाई करीत २९ हजार चौरस फुटांचे व्यावसायिक गाळे व प्लिंथ चे बांधकाम निष्कासित करण्यात आले आहे.**

Scanned with OKEN Scanner

CamScanner

यशोभूमि

# मीरा रोड में इफ्तार पार्टी का आयोजन

**यशोभूमि / प्रतिनिधि**

**मीरा रोड ।** इस्लाम धर्म का पाक रमजान का महीना चल रहा है और देश की अखंडता के लिए एवं मीरा भाईंदर शहर

## अ. पुलिस आयुक्त ने किया सम्बोधित

में शांति व्यवस्था बनाए रखने तथा लोगों में आपसी भाईचारा बनाए रखने के उद्देश्य से नया नगर पुलिस थाने के वरिष्ठ पुलिस निरीक्षक विलास सुपे ने इफ्तार पार्टी का आयोजन सोमवार को किया। इस इफ्तार पार्टी में सभी धर्मों के लोगों के साथ-साथ स्थानीय पत्रकारों को भी आमंत्रित किया गया।



अतिरिक्त पुलिस आयुक्त श्रीकांत पाठक ने उपस्थित लोगों को सम्बोधित करते हुए कहा कि पुलिस द्वारा आयोजित इस इफ्तार पार्टी का मुख्य उद्देश्य है कि हर धर्म के लोगों का एक दूसरे के साथ स्वस्थ संवाद हो और लोग एक दूसरे के धर्म की इज्जत करें तथा देश की अखंडता को मजबूती प्रदान करें। इंसानी संबंधों का दारोमदार स्वस्थ संवाद पर निर्भर रहता है। संवाद के माध्यम से ही हम हमारी चिंताएं और विचार एक दूसरे से साझा करते हुए सकारात्मक और संतुष्ट जीवन बिता सकते हैं। शहर के 99 प्रतिशत हर धर्म के लोगों को शांति से रहना पसंद है सिर्फ 1 प्रतिशत समाज कंटक ही कानून व्यवस्था और शांति भंग करने की नाकाम कोशिश करते हैं।



CamScanner

# Cops stumble upon killer who murdered lover's hubby in 2021

SURESH GOLANI / MIRA-BHAYANDAR

A tip-off about the presence of armed people who were planning some major offence not only led to their arrest but also unravelled their involvement in the gruesome murder of a man, which they had committed on the Vasai highway in 2021.

After receiving information about the arrival of armed suspects, the crime detection unit attached to the Pelhar police station laid a trap and apprehended a duo Pokhan Paran Sav, 50, and Abdul Mubarak Ali Shah alias Badda, 23, from the Dhaniv Baug area of Nallasopara East.

The duo who arrived at the spot in an auto-rickshaw were found to have a sword and a knife. It came to light that the duo along with their accomplice Imran Ibrahim Siddique had brutally murdered Vakil Ahmed Idrisi and dumped his body at an isolated area in

**Trio forcefully pushed the victim into rickshaw and strangled him to death before stabbing**

Bhaliwali village in Vasai tehsil on September 3, 2021.

According to the police, Pokhan had an affair with the wife of the deceased. Since Idrisi was proving to be an obstacle in the relationship, Pokhan hatched a conspiracy to kill him.

On the fateful night, the trio forcefully pushed him into an auto rickshaw and strangled him to death before stabbing him in the neck with the key of a two-wheeler. However, the case had remained unsolved for three years. Pokhan also wanted to kill another paramour of the woman, however his plan had failed to materialise.

The police arrested their accomplice and filed an offence at the Virar police station under sections 302 murder), 364 (kidnapping in order to murder),201 (causing disappearance of evidence), 504 (intentional insult) and 506 (criminal intimidation) of the Indian Penal Code.

THE FREE PRESS JOURNAL Wed, 10 April 2024
https://epaper.freepres:

CamScanner